SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416 004, MAHARASHTRA
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर–416 004 महाराष्ट्र
B Accredited by NAAC (2009
PHONE :EPABX-2690571(10 lines), 2693643(9 lines), 2693730 (9 lines)
FAX :0091-0231-2691533 & 0091-02312692333
PGBUTR SECTION Contact No. 0231 - 2609139

संदर्भ क्र.एस.यु./ पी.जी.बी.यु.टि.आर./आविष्कार/ 7879 दिनांक :– 18 OCT 2014

प्रति,
सर्व प्राचार्य/संचालक,
संलग्न महाविद्यालये/मान्यता प्राप्त संस्था

विषय :– आविष्कार संशोधन स्पर्धेतर्गत अग्रणी महाविद्यालयामध्ये जिल्हानिहाय संलग्न महाविद्यालयातील संशोधन कक्ष समन्वयकांसाठी कार्यशाळेसाठी उपस्थित राहणेबाबत.

उपरोक्त विषयसंदर्भात आपणास आदेशान्वये कळविणेत येते की, आपणास विदितच आहे की विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी आपण सर्वजण सदैव प्रयत्नशिल आहोत. याचाच भाग म्हणून प्रतिवर्षी आविष्कार संशोधन महोत्सवाचे आयोजन महाविद्यालय स्तरावर व तद्नंतर राज्यस्तरावर करण्यात येते. सदर महोत्सवामध्ये जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना सहभाग घेता यावा याकरिता कोल्हापूर, सांगली व सातारा या तीन जिल्हयामधील शिवाजी विद्यापीठांतर्गत संलग्न महाविद्यालयातील संशोधन कक्ष समन्वयकांसाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

सदर कार्यशाळेत तज्ञांमार्फत मार्गदर्शन करणेबाबत नियोजन करण्यात आले असून सदरची कार्यशाळा कोल्हापूर, सांगली व सातारा या जिल्हयामधील शिवाजी विद्यापीठ व खालील महाविद्यालयांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करणेत आलेली आहे.

| अ.क्र. | अग्रणी महाविद्यालयाचे नांव | कार्यशाळेचा दिनांक |
|---|---|---|
| 1 | दहिवडी कॉलेज दहिवडी, ता.माण, जि.सातारा. | 12 नोव्हेंबर 2014 |
| 2 | आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज कासेगांव, ता. वाळवा, जि. सांगली. | 13 नोव्हेंबर 2014 |
| 3 | व्यंकटेश महाविद्यालय, इचलकरंजी, जि. कोल्हापूर | 14 नोव्हेंबर 2014 |

सबब सदर कार्यशाळेसाठी आपल्या महाविद्यालयांतील एक 'संशोधन कक्ष समन्वयक' यांचे नांव आपल्या जिल्हयासाठी नेमून दिलेल्या वरील यजमान महाविद्यालयाकडे सर्व संबंधीत प्राचार्यांनी त्वरीत पाठवून द्यावे.

याबाबत खालील बाबीं विचारात घ्याव्यात –

1. सदरची कार्यशाळेसाठी महाविद्यालयातीलएक संशोधन कक्ष समन्वयका पाठवून देणे अनिवार्य आहे. काही कारणास्तव सदर प्रतिनिधी कार्यशाळेसाठी उपस्थित राहू शकत नसेल अशा वेळी दुसरा प्रतिनिधी पाठवून देणेची जबाबदारी संबंधित महाविद्यालय/ मान्यता प्राप्त संस्था प्राचार्य/संचालक यांची राहील.
2. कार्यशाळेसाठी उपस्थित राहणा–या संशोधन कक्ष समन्वयक यांचा प्रवासभत्ते बाबतचा खर्च संबंधित संलग्न महाविद्यालयाने करणेचा आहे.
3. सदर कार्यशाळेसाठी उपस्थित शिक्षकांना On Duty समजण्यात यावे.
4. कार्यशाळेसाठी उपस्थित असणारे प्रतिनिधींनी आपल्या महाविद्यालयातील सर्व शिक्षक व विद्यार्थी यांना वेळोवेळी प्रशिक्षण देवून आविष्कार संशोधनाबाबत मार्गदर्शन करणेचे आहे.

याबाबत अधिक माहीतीसाठी आपल्या जिल्यातील वर नमुद केलेल्या यजमान महाविद्यालयाशी संपर्क साधावा व आपल्या महाविद्यालयातील एक संशोधन कक्ष समन्वयक यांना कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी पाठविणेत यावेत.

कळावे,

आपला विश्वासू,

संचालक,
महाविद्यालय व विद्यापीठ
विकास मंडळ

सोबत :– वरील प्रमाणे
प्रत :– माहितीसाठी.

1. दहिवडी कॉलेज दहिवडी, ता.माण, जि.सातारा.
2. आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज कासेगांव, ता. वाळवा, जि. सांगली.
3. व्यंकटेश महाविद्यालय, इचलकरंजी, जि. कोल्हापूर